प्रत्येक भारतीयाने ..... प्रत्येक हिंदूने पाहिलेच पाहिजे असे विश्वातील सर्वात मोठे मंदिर .... अंगकोरवाट विष्णूधाम

## शोध भारताचा... भारतात आणि भारताबाहेर...

# अंगकोरवाट विष्णूधाम आणि कंबोडिया अर्थात कंबुज प्रदेश दर्शन

**मार्गदर्शक - प्रख्यात लेखक आणि इंडॉलॉजिस्ट - प्रा. क्षितिज पाटुकले**

**कालावधी - मुंबई ते मुंबई - ६ दिवस * थेट सियाम रिप येथेही सहभागी होता येईल**



**प्रमुख आकर्षणे** : जगातील सर्वात मोठे मंदिर अंगकोरवाट विष्णुधाम * अंगकोरवाट बलून राईड * अंगकोरथॉम * बयोन * बंटी श्राई * थाऊजंड लिंगा-कबाल स्पिऑन * ता प्रोम आणि प्री खान वृक्षमंदिरे * टोनले सॅप अर्थात तरंगते गाव * अप्सरा नृत्य * वॉर म्युझियम * नॅशनल म्युझियम * नाईट स्ट्रीटवरचा अभूतपूर्व जल्लोष आणि शॉपिंग मार्केट !

- फोर स्टार हॉटेलमध्ये वास्तव्य
- सर्वत्र ए.सी. वाहनाने प्रवास
- भारतीय साऊथ इंडियन भोजन

**सहभागी शुल्क - १) मुंबई ते मुंबई ९५, ०००/- (विमान प्रवास + ट्रॅव्हल इंश्युरन्ससह)**
**२) सियाम रिप ते सियाम रिप US$ ९९९/-**

GST 5%

सर्व माहिती, नोंदणी अर्ज व वेळापत्रक **www.kardaliwan.com/angkor** वेबसाईट वर उपलब्ध. व्हॉटस्अॅप वर माहिती मागवा **9657709678**

**ऑनलाईन बुकिंग करा**

॥कर्दळीवन॥ सेवा संघ

६२२, जानकी रघुनाथ, पुलाची वाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ०४.
फोन : (०२०) २५५३०३७१ ई मेल : swami@kardaliwan.com
मोबाईल : **9371102439 / 9657709678**

शोध भारताचा... भारतात आणि भारताबाहेर...

# अंगकोरवाट विष्णूधाम आणि कंबोडिया अर्थात कंबुज प्रदेश दर्शन

## मार्गदर्शक : प्रख्यात लेखक आणि इंडॉलॉजिस्ट - प्रा. क्षितिज पाटुकले

हिंदू मंदिराला आपल्या राष्ट्रध्वजावर स्थान देणारा आणि हिंदू मंदिराचे चित्र रियाल या आपल्या चलनी नोटेवर छापणारा कंबोडिया हा जगातील एकमेव देश आहे. पूर्णत: हिंदू मंदिरांवर आणि त्यामुळे विकसित झालेल्या पर्यटन संस्कृतीवर कंबोडियाचे आजचे अर्थकारण चालते. कंबोडिया हा देश आजच्या थायलंड आणि व्हिएतनाम या दोन देशांमध्ये आहे. एका बाजूला समुद्र आणि इतर सीमांवर लाओस, व्हिएतमान आणि थायलंड या देशांच्या सीमा कंबोडियाला लागून आहेत. इसवी सनाच्या पहिल्या शतकात (इ. स. ६५ च्या सुमारास) कौंडिण्य नावाचा एक तरूण आणि साहसी नाविक १४ – १५ जहाजांचा ताफा घेऊन दक्षिण भारतातून कंबोडिया देशात जाणारा पहिला भारतीय होता. त्याने तेथील नागवंशाच्या सोमा नावाच्या राजकन्येशी विवाह केला आणि मेकांग नदीच्या खोऱ्यात फूनान नामक एका हिंदू राज्याची स्थापना केली. फूनान, चेन–ला आणि ख्मेर या राजघराण्यांनी प्राचीन कंबुज देशावर राज्य केले. प्राचीन अंगकोर साम्राज्य हे याच ठिकाणी वसलेले होते. भारताप्रमाणेच कंबोडियातदेखील मंदिरे बांधली गेली. भारतातून सतत पंडित, विद्वान, स्थपती हे कंबोडियात जात होते आणि येथील ग्रंथ आणि स्थापत्य यांचे परस्पर आदान–प्रदान सुरू होते. कंबोडियाच्या मंदिर स्थापत्यावर दक्षिण भारतातील मंदिर स्थापत्यशैलीचा प्रभाव आहे. 'महामेरू' या संकल्पनेप्रमाणे संपूर्ण मंदिरच मेरू पर्वतासारखे बांधण्याचे प्रयोग तेथेही केले गेले.

भारतापासून कंबोडिया हे अंतर सुमारे ५००० किलोमीटर एवढे आहे. भारतातून कंबोडियाला जाण्यासाठी थायलंड येथील बँकॉक येथे विमानाने जावे लागते. साधारणपणे मुंबई येथून पाच ते साडेपाच तासांचा हा विमान प्रवास आहे. कंबोडियाची राजधानी नाम पेन्ह ही असली तरी मंदिरे, स्थापत्य आणि पर्यटन यासाठी सियाम रिप याठिकाणी जावे लागते. बँकॉक येथून सियाम रिप येथे जाण्यासाठी विमानाने ५० ते साठ मिनिटे लागतात. भारताबाहेरील देशातून येणाऱ्यांना थेट सियाम रिप येथे जॉईन होता येईल.

### कंबोडिया येथील प्रेक्षणीय ठिकाणे



❖ **अंगकोरवाट विष्णूधाम –** जगातील सर्वात मोठे प्रार्थनास्थळ – श्रीविष्णू मंदिर : युनेस्कोचा जागतिक वारसा म्हणून दर्जा मिळालेले, ख्मेर साम्राज्याचे अलौकिक भूषण आणि जगातील सर्व धर्मियांमधील सर्वात मोठे धार्मिक स्थळ म्हणून अंगकोरवाट मंदिराची जगभर ख्याती आहे. संकल्पना, रचना, स्थापत्य या सगळ्या बाबतीत भव्य आणि अवाढव्य हा शब्दही अपुरा पडेल असे हे अद्भुत आणि विलक्षण मंदिर आहे. ख्मेर राजा सूर्यवर्मन दुसरा ( इ.स. १११३ – ११८१) याने हे मंदिर बांधले. या मंदिरात जाण्यासाठी चारही बाजूंनी भले मोठे खंदक असून त्यावर दगडी पूल बांधलेले आहेत. हे मंदिर ५१० एकर एवढ्या प्रचंड परिसरात बांधलेले आहे. मंदिरात जातानाच्या मार्गावर एकेका टप्प्यावर एक अशा तटबंदी आहेत. येथील आठ हातांची विष्णू मूर्ती जवळजवळ १५ फूट उंच आहे. मंदिराच्या आतमध्ये जी तटबंदी आहे ती दगडी भित्तिचित्रांनी मढवलेली आहे. या तटबंदीने संपूर्ण मंदिराला विळखा घातला आहे. या तटबंदी एकापेक्षा एक ऊंचावर आहेत. त्यांची रचना पिरॅमिड सारखी असून आभाळात उंचच उंच गेलेले ५ कळस... एक मुख्य कळस मध्यभागी आणि चार उपदिशांना ऊंचीने थोडे कमी असलेले चार कळस अशी मुख्य मंदिराची रचना आहे. मुख्य मंदिर २२० फूट उंच आहे. या मंदिरात १० फूट उंच आणि ३०० फूट लांब असे ८ शिल्पपट आहेत. हे मंदिर पूर्ण झाले आणि आजूबाजुला लोकवस्ती झाली, तेंव्हा लंडनची लोकसंख्या होती ३०,००० आणि 'अंगकोर वाट'ची लोकसंख्या होती दहा लाख !



❖ **बलून मधून अंगकोरवाट दर्शन –** मुख्य मंदिरापासून अंदाजे ७ ते ८ किलोमीटर अंतरावर या मंदिराचे आकाशातून भव्य दर्शन घेण्यासाठी एक मोठा बलून आकाशात सोडलेला आहे. पतंगाप्रमाणे असणारा हा बलून एका मोठ्या लोखंडी दोरखंडानी बांधला आहे. त्यावर असणाऱ्या गोलाकार गॅलरीजवळ लोकांना उभे करून हा बलून २०० मीटर आकाशात वर घेऊन जातो. तेथून आपल्याला अंगकोरवाट मंदिराचे अद्भुत आणि विलक्षण दर्शन होते. हा एक थरारक आणि रोमांचक अनुभव आहे.



❖ **अंगकोरथॉम आणि बयोन –** ख्मेर सम्राट जयवर्मन – ७ वा याच्या राजधानीचे ठिकाण म्हणजे अंगकोरथॉम. जवळजवळ ९ वर्ग किलोमीटर एवढ्या परिसरात पसरलेल्या या राजधानीमध्ये राजाने विविध मंदिरे बांधली. संपूर्ण अंगकोरथॉम परिसराला दगडी तटबंदी आहे. त्याभोवती खंदक खोदलेला आहे. या खंदकावरून प्रवेश करण्यासाठी दगडी पूल बांधले आहेत. या पुलाच्या कठड्यावरून समुद्रमंथनाच्या प्रतिक असलेला नाग आणि देव – दानव यांच्या मोठ्या आकारातल्या मूर्ती कोरून ठेवल्या आहेत. प्रवेशद्वाराजवळ जे शिखर आहे त्या शिखरावर चारही बाजूंनी मानवी चेहरे दिसतात. या परिसरातच त्याने बयोन नावाचे एक भव्यदिव्य मंदिर बांधले आहे. हे अगदी मुद्दाम आणि आणि आवर्जून पाहण्यासारखे आहे. मुख्य मंदिराच्या शिखराभोवती त्याने ५० हून अधिक मनोरे बांधले आणि त्या प्रत्येक मनोऱ्याच्या शिखराभोवती लोकेश्वर बुद्ध या देवतेचे चेहरे दगडात कोरून चार दिशांना बसवले. सध्या त्यातले ३७ च मनोरे शिल्लक आहेत. अतिशय आकर्षक असे हे स्थापत्य आहे. मंदिराच्या शिखरासारखा असलेला भाग आणि त्यावर कोरलेले मानवी चेहरे हे जगात इतरत्र कुठेही सापडत नाहीत.



❖ **थाऊजंड लिंगा दर्शन – कबाल स्पिअन :** सीएम रीप पासून ४० किलोमीटर अंतरावर हे ठिकाण आहे. सीएम रीप नदी या डोंगरावरून खाली येते आणि पुढे सीएम रीप शहराकडे जाते. इथे डोंगरमाथ्यावर खडकात हजारो शिवलिंग खोदलेली आहेत. ही शिवलिंगे नदीपात्रात खोदलेली असल्यामुळे या नदीचे सहस्रलिंग नदी असेही नामकरण केले गेले आहे. या शिवलिंगासोबत ब्रह्मदेवाचे अंकन इथे नदीपात्रातल्या खडकावर केलेले आहे. पण इथे बघण्यासारखे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे इथे असलेल्या शेषशायी विष्णूच्या प्रतिमा. ज्या खडकावरून ही नदी वाहते त्या खडकावर शेषशायी भगवान कोरलेले आहेत.



❖ **बंटी श्राई मंदिरे :** इ. स. १० व्या शतकात ख्मेर राजवटीमधील राजेंद्र वर्मा दुसरा ( इ.स. ९४४ – ९६८) हा राज्य करीत होता. त्याच्या काळात बंटी श्राई मंदिरे बांधलेली आहेत.

बंटी श्राई हे मंदिर दगडावर कोरीव कामाच्या दृष्टीने सर्वांत विशेष आहे. इतके बारीक आणि सुबक काम आहे की जणूकाही ते लाकडात कोरल्यासारखे


 

वाटते. या कामासाठी त्याकाळी कुशल शिल्पकार मुद्दाम भारतातून बोलावून घेतले होते, असे त्या मंदिरातल्या एका शिलालेखात लिहिले आहे. या मंदिरात खांडववन दहन, सीतेचे अपहरण, कंसवध, हिरण्यकशिपू वध, कैलासतोलन, कामदेवदहन, तारा विलाप अशी अत्यंत सुबक शिल्पे कोरलेली आहेत.

❖ **ता प्रोम आणि प्री खा वृक्षमंदिरे :** सातव्या जयवर्मन राजाने बांधलेली ही अप्रतिम बौद्ध मंदिरे आहेत. याठिकाणी प्रज्ञा परमिता या देवीचे मंदिर आहे अशी मान्यता आहे. साधारण १२ व्या शतकात बांधलेली मंदिरे आहेत.  जवळजवळ ४०० वर्षे सगळा अंगकोर साम्राज्याचा परिसर संपूर्णपणे दुर्लक्षित राहिला होता. फ्रेंच जीवशास्त्रज्ञ ऑरी माऊ हा काही वनस्पतींच्या शोधासाठी इथे फिरत असताना त्याला मंदिराचे अवशेष आढळले. त्याने स्थानिक लोकांच्या मदतीने ते स्वच्छ करून घेऊन एक एक मंदिर त्या झाडांच्या दाटीतून बाहेर काढले. अशा प्रकारे असंख्य मंदिरे उघडकीला आली. जवळजवळ ४०० वर्षे संपूर्णपणे झाडीत असलेल्या या मंदिराच्या अवतीभोवती झाडांच्या मुळांचा विळखा पडला होता. भोवतालची झाडे तोडली तर मंदिरेसुद्धा कोसळतील. म्हणून ती झाडे तशीच ठेऊन ही मंदिरे मोकळी केलेली आहेत. कंबोडिया सरकारने वृक्ष मंदिरे असे यांचे नामकरण करून पर्यटकांना आकर्षित केले आहे. ता प्रोम मंदिरांना भेट देताना आपण कधी झाडाच्या ढोलीतून तर कधी त्याच्या फांद्यांच्या संभारामधून  जातो तेव्हा विलक्षण अनुभव येतो.


❖ **अप्सरा नृत्य नाटिका –**  अप्सरा या कंबोडियाच्या राष्ट्रीय अभिमानाच्या आणि संस्कृतीच्या मुकुटमणी आहेत. अंगकोरवाट मंदिरातही सुमारे दोन हजारहून अधिक अप्सरा कोरलेल्या आहेत. तेथील प्रत्येक मंदिर आणि स्थापत्यामध्ये अप्सरा हा एक अविभाज्य भाग असतो. त्या अप्सरांचाच खुबीने वापर करुन अप्सरा नृत्य हा एक लोकप्रिय नृत्य नाटिका प्रकार तेथे सादर केला जातो. एका मोठ्या सभागृहात / प्रेक्षागृहात व्यासपीठावर  अप्सरा नृत्य नाटिका सादर केले जाते. यामध्ये स्थानिक प्राचीन वादकांचा चमू असतो. तो प्रथम विविध प्रकारची वाद्ये वाजून दाखवतो. त्यानंतर रंगमंचावर साक्षात अप्सरा अवतीर्ण होतात आणि आपल्या मोहक अदाकारीने आणि लालित्याने बहारदार नृत्ये सादर करतात. रंगमंचासमोर बसून आपल्याला त्यांचा आनंद घेता येतो.





❖ **टोनले सॅप ( तरंगते गाव ) नो मॅन्स लँड**  – टोनले सॅप हि एक फार मोठी नदी असून तिचा विस्तार समुद्रासारखा मोठा आहे. कित्येक मैल पसरलेल्या या नदीत बारमाही पाणी असते. याला गोड्या पाण्याचा समुद्र असेही गमतीने  म्हटले जाते. या नदीवरच तरंगते गाव वसलेले आहे. हे जगातील एक मोठे आश्चर्य आहे. अमेरिका आणि व्हिएतनाम यादवी युद्धामध्ये अनेक व्हिएतनामी नागरीक जीव वाचवण्यासाठी  देश सोडून पळाले. त्यांनी जवळपासच्या देशांचा आश्रय घेतला. त्यातील अनेक लोक होड्या आणि छोट्या बोटीतून टोनले सॅप मध्ये आले. त्यांनी कंबोडियामध्ये आश्रय घेण्याचा प्रयत्न केला. परंतु स्थानिक पोलिसांनी त्यांना अटकाव केला. शेवटी त्यांनी  टोनले सॅप नदीतच

आश्रय घेतला आणि ते तिथेच वसती करून राहिले आहेत. त्यांच्याकडे कोणताही रहिवासी पुरावा नाही. म्हणून त्यांना नो मॅन्स लँड वरील नागरीक असे म्हटले जाते.



❖ **अंगकोरवाट नॅशनल म्युझियम –** म्युझियम हे त्या त्या प्रदेशाची संस्कृती, इतिहास, कला आपल्या समोर उलगडून दाखवत असतात. सीएम रीपचे म्युझियम सुद्धा असेच नितांत सुंदर आहे. ख्मेर राजवटी, त्यातले मोठेमोठे राजे, त्यांनी केलेली कामे अशा अनेक गोष्टी इथे विविध दालनातून मांडून ठेवलेल्या आहेत. प्रत्येक राजवटीमधील ठळक वैशिष्ट्ये, त्यांच्या काळातील सापडलेले अवशेष इथे खूप सुरेख मांडून ठेवले आहेत. त्याचसोबत १००० बुद्ध मूर्ती असलेले दालन तर केवळ प्रेक्षणीय आहे. विविध काळात बुद्ध मूर्ती कशा घडवल्या जात असत, त्यांच्या चेहरेपट्टीमध्ये कसे बदल होत गेले याचे सुंदर दर्शन या दालनात पाहण्यास मिळते.



❖ **कंबोडिया वॉर म्युझियम –** कंबोडियामध्ये १९७५ ते १९७९ या दरम्यान स्थानिक युद्धामध्ये यादवी माजली होती. पॉल पोट नावाच्या हुकुमशहाने माजवलेल्या अंतर्गत बंडाळीत त्यावेळी ३० लाखांहून अधिक लोक मारले गेले. त्यांचे अवशेष, युद्धसामग्री, विमाने, तोफगोळे यांचे दर्शन वॉर म्युझिअम मध्ये होते. हिटलरला लाजविल अशा प्रकारचे नृशंस हत्याकांड त्यावेळी कंबोडियामध्ये झाले होते. विशेष म्हणजे संपूर्ण जगाला त्याचा पत्ताही लागला नाही. याच कारणामुळे आज कंबोडियामध्ये महिलांची संख्या पुरूषांपेक्षा खूप जास्त आहे असे म्हटले जाते.

## शोध भारताचा... भारतात आणि भारताबाहेर

**भारतीय संस्कृती आणि परंपरा फार प्राचीन काळापासून संपूर्ण विश्वात पसरलेल्या आहेत. घराघरातून सोन्याचा धूर निघतो तो देश म्हणजे भारत, अशी भारताची संपूर्ण विश्वात ओळख होती. केवळ भारताचा शोध घेण्याच्या दुर्दम्य इच्छेने अनेक धाडसी पुरूष प्राण पणाला लावून त्यांचे देश सोडून महासागरांमधून साहसी मोहिमा आखत असत. मुस्लिम आक्रमणे, मुघल राजवट आणि त्यानंतरच्या काळात भारताला आपले विजिगिषू सामर्थ्य, गौरवशाली परंपरा आणि अभूतपूर्व क्षमता यांचा विसर पडला आहे. शोध भारताचा... भारतात आणि भारताबाहेर ही संकल्पना म्हणजे देश विदेशातील प्राचीन आणि समृद्ध भारतीय संस्कृतीची आणि परंपरांची आजच्या भारतीयांना ओळख करुन देण्याचा उपक्रम आहे. युट्युब चॅनेल, कार्यशाळा आणि अभ्यासक्रम आणि देशविदेशात सहली असे या उपक्रमाचे स्वरूप आहे.**

## मार्गदर्शक प्रा. क्षितिज पाटुकले यांच्या विषयी माहिती

**साहसी आध्यात्मिक पर्यटनाची ज्यांनी भारतामध्ये मुहुर्तमेढ रोवली अशा अग्रणी व्यक्तिंपैकी एक म्हणजे प्रा. क्षितिज पाटुकले हे आहेत. ते स्वत: प्रख्यात लेखक, इंडॉलॉजिस्ट असून त्यांनी अनेक आध्यात्मिक आणि अपरिचित परंतु जागृत ठिकाणे प्रकाशात आणली आहेत. अत्यंत घनदाट जंगलात वसलेले अक्कलकोट श्रीस्वामी समर्थांचे प्रकटस्थान कर्दळीवन, पांडव जेथून स्वर्गाकडे गेले ते स्वर्गारोहिणी, शंभरहून अधिक समाधी असलेले बसवकल्याण दत्त मंदिर, श्रीखंड, मणिमहेश आणि किन्नर कैलाश इ. ठिकाणी स्वत: जाऊन, त्यावर सखोल संशोधन करून त्यांनी पुस्तके प्रकाशित केली आहेत. हजारो साहसी पर्यटकांनी या ठिकाणी भेटी दिल्या आहेत.**

**प्रा. क्षितिज पाटुकले हे इंजिनिअर असून एल.एल.बी., फेलो – इंश्युरन्स इंस्टिट्युट ऑफ इंडिया, व्यवस्थापन, अर्थ आणि उद्योजकता तज्ज्ञ, योगथेरपी तज्ज्ञ, अशा अनेक क्षेत्रात त्यांनी प्राविण्य मिळविले आहे. एम. ए. इंडॉलॉजी, इंडियन नॉलेज सिस्टीम, दासबोध प्रबोध, राष्ट्रभाषा पंडित असे अनेक अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केले आहेत. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे ते मानद सदस्य आहेत. भारत इतिहास संशोधक मंडळाचे आजीव सभासद आहेत. तसेच International Center For Cultural Studies USA (ICCS) याचेही ते पुण्यातील संस्थापक सदस्य आहेत. विश्व मराठी परिषदेचे संस्थापक अध्यक्ष आहेत. विज्ञानभारती, विवेकानंद केंद्र, साहित्य परिषद, युथ होस्टेल, इ. अनेक संस्थांबरोबर ते जोडलेले आहेत. त्यांचे विषयी अधिक जाणून घेण्यासाठी कृपया त्यांच्या संकेतस्थळाला www.kshitijpatukale.com भेट द्यावी ही विनंती.**

# प्रवास कार्यक्रम – Itinerary

| दिवस | दिनांक | वेळ | ठिकाण | निवास |
|---|---|---|---|---|
| ० | पहिला दिवस | १.०० पहाटे | मुंबईहून प्रयाण | |
| १ | पहिला दिवस | १.०० दुपारी | सियाम रिप | ४ स्टार हॉटेल |
| २ | दुसरा दिवस | | सियाम रिप | ४ स्टार हॉटेल |
| ३ | तिसरा दिवस | | सियाम रिप | ४ स्टार हॉटेल |
| ४ | चौथा दिवस | | सियाम रिप | ४ स्टार हॉटेल |
| ५ | पाचवा दिवस | | सियाम रिप | ४ स्टार हॉटेल |
| ६ | सहावा दिवस | ३.३५ दुपारी | मुंबईकडे प्रयाण | |
| | सातवा दिवस | १.०० पहाटे | मुंबई येथे आगमन | |

## पहिला दिवस – कंबोडिया येथे आगमन – अप्सरा नृत्य

सियाम रिप विमानतळावर दुपारी १ वाजता आगमन... ऑन अराईव्हल व्हिसा प्रक्रीया – एक ते दीड तास

तेथून हॉटेलकडे प्रयाण, हॉटेलमध्ये चेक इन, भारतीय हॉटेलमध्ये भोजन आणि विश्रांती. संध्याकाळी ५. ३० वा. अप्सरा नृत्य आणि भोजन, रात्री नाईट स्ट्रीट आणि रात्री १०.०० हॉटेलमध्ये विश्रांती.

## दुसरा दिवस – अंगकोर थॉम – बंटी श्राई मंदिरे

सकाळी हॉटेलमध्ये नाष्टा करून ९.०० वाजता अंगकोरथॉम मंदिराकडे वाहनातून प्रयाण. ख्मेर सम्राट ७ वा जयवर्मन याने हे १२ व्या शतकात प्रसिद्ध मंदिर बांधले आहे. त्याची राजधानी म्हणजे अंगकोर थॉम, त्याबरोबर बयान, बंटी श्राई, बंटी सामरे, निक पियान, प्री खा. संध्याकाळी ६.०० वा. हॉटेलमध्ये परत.

## तिसरा दिवस – थाऊजंड लिंगा, ता प्रोम आणि प्री खान वृक्ष मंदिरे

सकाळी ६.४५ नाष्टा. ७. ३० सकाळी – प्रयाण. थाऊजंड लिंगा, प्रा रूप आणि ता प्रोम संध्याकाळी ५.०० वा. हॉटेलमध्ये परत..

## चौथा दिवस – टोनले सॅप, वेस्ट बराय, नॅशनल आणि वॉर म्युझिअम

७.३० वा. – नाष्टा. ८. ३० वा. – प्रयाण. टोनले सॅप अर्थात तरंगते गाव, वेस्ट बराय, वॉर म्युझिअम, नॅशनल म्युझिअम. संध्याकाळी ६.०० वा. हॉटेलमध्ये परत.

## पाचवा दिवस – अंगकोरवाट मंदिर आणि बलून राईड

सकाळी ७.०० वा नाष्टा. ७.३० वाजता प्रयाण. अंगकोरवाट मंदिर, अंगकोरवाट बलून राईड. (बलून सुरू असल्यासच जाता येईल कारण बलून राईड हवामानावर अवलंबून असते. जोरात ढग आणि वारा असेल तर बंद असते याची कृपया नोंद घ्यावी.) संध्याकाळी ६.३० वा. हॉटेलमध्ये परत.

## सहावा दिवस – परतीचा प्रवास

सकाळी नाष्टा करून ९.३० वाजता हॉटेलमधून विमानतळाकडे प्रयाण

दुपारी ३.३५ मुंबईकडे विमान प्रयाण



## विमान प्रवासाचा तपशील – जाता येता – मुंबई ते मुंबई

**१) मुंबई ते सियाम रिप –** अंधेरी, मुंबई येथे इंटरनॅशनल एअरपोर्टवर आदल्या दिवशी रात्री १० वाजेपर्यंत पोहोचायचे आहे.
दुपारी १.०० वाजता – सियाम रिप विमान तळ येथे आगमन

**२) सियाम रिप ते मुंबई –** सहावा दिवस दुपारी ३.३५ वाजता
रात्री १२.०० वाजता मुंबई येथे आगमन.
सातव्या दिवशी पहाटे एक वाजेपर्यंत अंधेरी, मुंबई, इंटरनॅशनल एअरपोर्ट बाहेर येऊ.

## थेट सियाम रिप येथे जॉईन होणाऱ्यांसाठी सूचना

**१)** सहलीच्या दुसऱ्या दिवशी दुपारी ३.०० पर्यंत किंवा त्यापूर्वी सियाम रिप येथे पोहोचणे. नोंदणी करण्यापूर्वी पोहोचण्याची तारीख नक्की करून घ्यावी. **२)** सहलीच्या सहाव्या दिवशी सकाळी १०.०० नंतर कुठल्याही विमानाचे परतीचे तिकीट काढावे.

## ✓ आपल्या सहलीमध्ये समाविष्ट बाबी....

१) ५ रात्री ४ स्टार हॉटेलमध्ये सियाम रिप येथे निवास.
२) विमान प्रवास सोडून इतर वेळी सकाळचा नाष्टा, दुपारचे आणि रात्रीचे भारतीय रेस्टॉरंटमध्ये जेवण. सकाळचा नाष्टा हॉटेलमध्येच उपलब्ध असेल.
३) माहितीपत्रकामध्ये दर्शविल्याप्रमाणे सर्व सहल आणि मंदिरे दर्शन यांचा प्रवेश शुल्कासह समावेश.
४) अप्सरा नृत्य, तरंगत्ते शहर आणि अंगकोरवाट बलून राईड ( बलून उपलब्ध असल्यास )
५) ट्रॅव्हल सिमकार्ड – कॉलिंग + डेटा
६) प्रती व्यक्ती टूर दरम्यान दररोज पाण्याची एक बाटली
७) कंबोडीयाची व्हिसा फी
८) ड्रायव्हर, सहाय्यक इ. ना. द्याव्या लागणाऱ्या टीप्स
९) मार्गदर्शकांचे शुल्क
१०) ट्रॅव्हल इंश्युरन्स

## ✗ आपल्या सहलीमध्ये समाविष्ट नसलेल्या बाबी....

१) वैयक्तिक खर्च – शॉपिंग, वैद्यकिय आणि इतर खर्च
२) भोजना दरम्यानचे सर्व प्रकारच्या ड्रिंक्स आणि पॅक्ड वॉटर
३) वरील उल्लेख न केलेला इतर खर्च

**पासपोर्ट विषयी – किमान ७ महिने व्हॅलिड असलेला पासपोर्ट हवा म्हणजे पासपोर्ट एक्सपायरी डेट सहल संपण्याच्या दिनांकापासून किमान ७ महिन्यानंतरची हवी.**

**फोटोविषयी – इंटरनॅशनल आयडेंटीटी साईजचे समोरील बाजूने काढलेले ८ फोटो बरोबर ठेवावेत.**

## सहभागी वर्गणी

**अ. मुंबई ते मुंबई – ₹ ९५,०००/– जीएसटी ₹ ४२५०/– एकूण ₹ = ९९,२५०/–**
**विमान प्रवास + ट्रॅव्हल इंश्युरन्ससह**

**ब. सियाम रिप ते सियाम रिप – US $ ९९९/–**

**GST 5% Extra**

## सहभागी वर्गणी भरण्याची पद्धत

**अ. मुंबई ते मुंबई – नोंदणी करतेवेळी – रू. ६०,०००/– सहल तारखेच्या १५ दिवस आधी – रू. ३९,२५०/–**

**ब. थेट सियाम रिप – नोंदणी करतेवेळी – US $ ६००/– सहल तारखेच्या १५ दिवस आधी – US $ ३९९/–**

## बँक खात्याची माहिती

**खात्याचे नाव :– कर्दळीवन सेवा संघ एल. एल. पी (Kardaliwan Seva Sangh LLP)**

**बँकेचे नाव :– बँक ऑफ महाराष्ट्र, डेक्कन जिमखाना पुणे शाखा, चालू खाते क्र. 60351921286**

**IFSC Code : MAHB0000003** **Swift Code : MAHBINBBDGP**

## सहल रद्द करण्याबाबतची प्रक्रीया

**१) किमान सहल रद्द करण्याचे शुल्क – रू. ३०,०००/–**

**२) ४५ दिवस आधीपर्यंत रद्द करण्याचे शुल्क – रू. ४०,०००/–**

**३) २५ दिवस आधीपर्यंत रद्द करण्याचे शुल्क – रू. ५०,०००/– त्यानंतर सहल रद्द करता येणार नाही.**

**सोबत आवश्यक गोष्टी – नी– कॅप्स, अंक्ललेट, पेन किलर क्रीम, आपली दैनंदिन औषधे इ.**

## नोंदणी कशी करावी ?

१) नोंदणी अर्ज + आधारकार्ड + पासपोर्ट झेरॉक्स + १ फोटो आयडेंटि साईज कार्यालयात जमा करावा किंवा ईमेल द्वारा, किंवा कुरीयरने पाठविता येईल.

२) तसेच ऑनलाईन नोंदणी करता येईल. रक्कम भरल्यावरच नोंदणी नक्की होईल. सहलीसाठीची रक्कम आमच्या कार्यालयात रोखीने, चेकने किंवा आमच्या बँक ऑफ महाराष्ट्राच्या खात्यावर रोखीने, चेकने, ऑनलाईन ट्रान्सफर करून भरता येईल.

३) सहलीमध्ये कर्दळीवन सेवा संघाने तयार केलेले नियम आणि शिस्त कसोशीने पाळावे लागतील. त्या सर्वांची माहिती नोंदणी अगोदरच करून घ्यावी ही विनंती. परिस्थितीनुरुप सहलीच्या कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार कर्दळीवन सेवा संघाने राखून ठेवलेला आहे, याची नोंद घ्यावी. कोणतीही माहिती, शंका, अडचण विनासंकोच, मोकळेपणाने आणि प्रांजळपणे आधीच विचारून आणि समजून घ्यावी. मनाचे समाधान झाल्यावरच सहलीसाठी नावनोंदणी करावी ही विनंती.

४) सर्व प्रकारच्या तक्रारी, दावे यासाठी न्यायालयीन प्रक्रियेची सीमा, पुणे शहर न्यायलयीन क्षेत्र हे राहील.

✻ ✻ ✻

कर्दळीवन सेवा संघ पुणे आयोजित

# अंगकोरवाट विष्णूधाम आणि कंबोडिया दर्शन सहल नोंदणी अर्ज

## कार्यालयीन उपयोगासाठी

☐ मुंबई ते मुंबई ☐ सियाम रिप ते सियाम रिप

| | | |
|---|---|---|
| सहल दिनांक : | जमा केलेली रक्कम : | रोख : (कार्यालय/बँक) |
| नोंदणी दिनांक : | बाकी रक्कम : | चेक : (कार्यालय/बँक)<br>ऑनलाईन : |

(१) नाव:– श्री/सौ/श्रीमती/कु. ____________________

(२) पूर्ण पत्ता:– ____________________

____________________

फोन नं:– ____________________

(३) व्हॉट्सअ‍ॅप क्र. :– ____________ मोबाईल ____________

(४) ईमेल:– ____________________

(५) जन्मतारीख:–__________ वय__________ लिंग : स्त्री / पुरूष __________

(६) व्यवसाय:– ____________________

(७) जवळच्या नातेवाईकांचे नाव, मोबाईल, ई–मेल?

नाव ____________________ मोबाईल ____________

(८) यापूर्वी परदेशी प्रवास केला आहे का? असल्यास कुठे?

____________________

(९) कंबोडिया सहलीची सर्व माहिती, नियम, अटी आपण समजावून घेतल्या आहेत का?

____________________

(१०) पासपोर्ट क्रमांक____________________ व्हॅलिडीटी____________

(११) आधारकार्ड क्रमांक____________________

मी कंबोडिया सहलीमध्ये स्वतःच्या इच्छेने, पूर्णतः स्वतःच्या जबाबदारीवर सहभागी होऊ इच्छितो. मी या सहलीविषयी, त्यातील प्रवास, अडचणी, मार्ग यांबाबत सर्व माहिती घेतली आहे. कृपया मला यामध्ये सहभागी करुन घ्यावे, ही विनंती.

ठिकाण – सही –

दिनांक – नाव –

# अंगकोरवाट विष्णूधाम आणि कंबोडिया दर्शन सहल

## संमतीपत्र + हमीपत्र

कर्दळीवन सेवा संघातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या अंगकोरवाट विष्णूधाम आणि कंबोडिया दर्शन सहलीची संपूर्ण माहिती मी स्वतः करून घेतली आहे आणि ती मला पूर्णत: समजली आहे. त्यातील प्रवास जोखीम आणि अडचणी मी समजून घेतल्या आहेत. मी या सहलीमध्ये सहभागी होण्याबाबत माझे अत्यंत जवळचे कुटुंबीय आणि नातेवाईक यांना कल्पना दिली आहे.

मी ही सहल पूर्ण करण्यासाठी वैद्यकीय दृष्ट्या पूर्णपणे तंदुरुस्त आहे. सहली दरम्यान माझी वैद्यकीय जबाबदारी पूर्णतः माझ्यावरच आहे. त्याची कोणतीही जबाबदारी आयोजकांवर असणार नाही.

ही संपूर्ण सहल मी माझ्या स्वत:च्या हिंमतीवर आणि जबाबदारीवर पूर्ण करीन. सहली दरम्यानचे नियम आणि शिस्त यांचे मी सहल यशस्वी होण्यासाठी मनःपूर्वक पालन करीन आणि कर्दळीवन सेवा संघाला सर्व प्रकारचे सहाय्य करीन, ह्याची मी हमी देत आहे.

ठिकाण –

दिनांक –

अर्जदाराची सही –

नाव –

साक्षीदाराची सही –

साक्षीदाराचे नाव व पत्ता –